RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 August, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 August, 2017

# अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा    अंक : दुसरा    ऑगस्ट २०१७



नाम साहेब दा चंबे दी बूटी (भजन) 4

गुरूमत (सत्संग) 11

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 25

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासापूर्वी दिलेला संदेश) 32

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

# नाम साहेब दा चंबे दी बूटी

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी कॅनाडामध्ये २५ जून ७७ रोजी संगतच्या विनंतीवरून महाराज कृपालजींच्या स्मरणात गायलेले एक भक्तीभावात्मक भजन



नाम साहेब दा चंबे दा बूटी (२)
सतगुरु मन मेरे विच लाई प्यारेयो (२)
सतसंग दा नित पानी दे के (२)
कर लई दूण सवाई प्यारेयो (२)
अंदर बूटी महक मचाया (२)
जां फुल्लण ते आई प्यारेयो (२)
जीवे कृपाल सोहणा सतगुरु (२)
जिने ऐह बूटी लाई प्यारेयो (२)
कृपाल सिंह नूं सिमर के पापी तरे अनेक (२)
कहे ‘अजायब’ ना छोड़िए, कृपाल सिंह दी टेक (२)

सुण फरियाद पीरां देया पीरा (२)
इक आख सुणावां तैनूं प्यारेया (२)
तेरे जेहा मैनूं इक्क वी नीं मिलणा (२)
मेरे जेहियां तैनूं लक्खीं प्यारेया (२)
फोल ना कागज बदियां वाले (२)
दर तो धक्कीं ना मैनूं प्यारेया (२)
जे मेरे विच ऐब गुनाह ना हुंदे (२)
तूं बक्शींदा कीहनूं प्यारेया (२)
तिल–तिल दा अपराधी तेरा (२)
रत्ती–रत्ती दा मैं चोर प्यारेया (२)
पल–पल दा मैं गुन्हीं भरया (२)
बक्शीं अवगुण मेरे प्यारेया (२)

किसे काम का थे नहीं कोई ना कौडी दे (२)
कृपाल सिंह सतगुरू मिलया भई अमोलक देह (२)
दूसर का बालक होता भक्ति बिना कंगाल (२)
कृपाल गुरु कृपा करी हर धन दे कियो निहाल (२)
गद–गद् बानी कंठ में आंसू टपके नैन (२)
वो तो बिरहन कृपाल की तड़पत है दिन–रैन (२)
हाय–हाय कृपाल कद मिले छाती फाटी जाऐ (२)
ऐसा दिन कद होवेगा दर्शन करुं अघाये (२)
बिन दर्शन कल ना पड़े मनुआ धरत ना धीर (२)
'अजायब' गुरु कृपाल बिना कौन बंधावे धीर (२)

तुध अग्गे अरदास हमारी (२)
जियों पिंड सब तेरा प्यारेया (२)
कहे नानक सब तेरी वडयाई (२)
कोई नाम न जाणे मेरा प्यारेया (२)

तेरा कीता मैं जातो नाहीं (२)
मैनूं जोग कीतोई प्यारेया (२)
मैं निर्गुणहारे कोई गुण नाहीं (२)
आपे तरस पेयोई प्यारेया (२)
तरस पया मैं रहमत होई (२)
सतगुरु साजन मिलया प्यारेया (२)
नानक नाम मिले तां जीवां (२)
तन मन थीवै हरेया प्यारेया (२)

त्या परिपूर्ण परमात्म्याचे नाम चंबेच्या रोपाप्रमाणे आहे. बागेमध्ये एक रोपटे लावलेले असते ज्यास रातराणी असेदेखील संबोधले जाते. त्याचा सुगंध रात्रभर बागेत दरवळत राहतो. त्याचप्रमाणे ज्यांच्या अंतरात परमात्म्याचे नाम प्रगट होते, त्यातूनही सुगंध दरवळू लागतो. ज्याप्रमाणे बागेत माळी रातराणीचे रोपटे लावतो, त्याचप्रमाणे सेवकाच्या अंतरामध्ये संत-सतगुरू नामाचे रोपटे लावतात. ज्याप्रमाणे त्या रातराणीच्या रोपट्यास पाण्याची गरज असते म्हणून माळी त्यावर पाण्याचे सिंचन करतो, त्याचप्रमाणे संत-सतगुरू नामरूपी रोपट्यास सत्संगाचे पाणी देतात. नित्यनेमाने, सत्संगाचे पाणी दररोज त्यास मिळत राहिल्यास रात्रं-दिवस त्या रोपट्याची वाढ होत राहते. रातराणीच्या रोपट्यास फुले आल्यावर, त्याचा सुगंध दरवळू लागतो. याचप्रमाणे ज्यांच्या अंतरात नामाचे रोपटे प्रगट झालेले असते, त्याचा सुगंध बाह्य जगात दरवळतो परंतु हा सुगंध घेऊ शकणारे नाक विरळेच असते. ज्यांचे नाक स्वच्छ असते तेच या सुगंधाचा आस्वाद घेतात.

महाराज सावन सिंहजी एक घटना सांगत असत. त्यावेळी एप्रिल महिना होता. मी एका डोंगरावर चढत होतो. त्याकाळी मी इंजिनियर म्हणून नोकरी करत होतो. अचानक मला प्रसन्न वाटू लागले. मी विचार करू लागलो, या क्षणी ना सरकारद्वारे नोकरीमध्ये उन्नती मिळणार आहे, ना एखाद्या मुला-मुलीचा विवाह होणार आहे. तरीही मला इतकी प्रसन्नता का

वाटत आहे? काही अंतरावर मस्ताना नावाचा एक फकीर बसलेला होता. मला पाहून दूर वरूनच तो म्हणाला,''सुगंधाची जाणीव होणारे नाक विरळेच असते.'' तेव्हा माझ्या लक्षात आले की सुगंध त्या फकीरामधुनच येत आहे.

दहा गुरूंपैकी नवव्या गुरूंना आदेश होता की तू लोकांच्या नजरेआड राहूनच ध्यान-अभ्यास करायचा आहेस. त्यामुळे बाह्य जगात त्यांना कुणीच ओळखत नव्हते. त्यांनी आयुष्यभर ध्यान-अभ्यासच केला होता. हुजूर कृपालजींनी जेव्हा मला त्यांच्या चरणी आणले, तेव्हा त्यांनी मला हाच आदेश दिला की तू भरपूर ध्यान-अभ्यास कर. एखादा क्षणही वाया न घालविता तुला आपले जीवन ध्यान-अभ्यासामध्ये व्यतीत करायचे आहे. अंदाजे सात वर्षे जमिनीखाली गुहा बनवून मी ध्यान-अभ्यास करीत राहिलो. त्यावेळी माझ्याजवळ एक सेवादार होता. बाह्य जगामध्ये यावे असा विचारही मी करीत नव्हतो.

पश्चिमेकडील लोकांना मी अजिबात ओळखत नव्हतो. माझ्या अंतरातील नामाच्या सुगंधानेच तुम्हाला येथे खेचून आणले. आश्रमामध्ये मी ठाम निश्चय केला होता की वर्षभर कुणालाही भेटायचे नाही. प्रेमीजनांनी खूपच आग्रह केल्यानंतर, आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यानच्या तासाभरात त्यांना भेटण्याचे मी मान्य केले. परमात्म्याची कृपा की जेवढा अधिक काळ मी आतमध्ये राहिलो, तेवढे अधिक पश्चिमेकडील प्रेमी माझ्याकडे येऊ लागले.

मी माझ्या आश्रमाच्या पन्नास मैल कक्षेतील प्रेमींना सूचना देऊन ठेवली होती की पश्चिमेकडील तसेच या देशातील कोणीही मनुष्य मला भेटण्यासाठी माझ्याकडे येऊ नये. रसल पर्किन्स आणि कुलवंत दोघेही तुमच्या सोबत बसलेले आहेत. तुम्ही त्यांनाच विचारा की माझ्याकडे येण्यासाठी त्यांना किती अडचणींचा सामना करावा लागला होता? त्यांना माझे निरोप मिळत असे की माझ्याकडे कुणीही येऊ नये. कृपालजींनी जे नामाचे रोपटे लावले होते, त्या रोपट्याच्या सुगंधानेच त्यांना येथे खेचून आणले होते.

मी त्या सर्वशक्तिमान कृपाजींचा आभारी आहे, ज्यांनी हे नामाचे रोपटे लावले. महाराज कृपालजींपासून मी दूरावलेलो होतो. त्या विरहामुळे माझ्या नेत्रांमधून सातत्याने अश्रु वाहत असलेली माझी अवस्था ऐरन पाहून गेला होता. जेव्हा मी बोलत असे, तेव्हा माझा कंठ दाटून येत असे. कृपालजींच्या विरहामुळे माझी अशी अवस्था झाली होती की कोणत्याही परिस्थितीत महाराज कृपालजी मला भेटावेत अशी उत्कंठा माझ्या अंत:करणात सारखी येत असे. एडम स्टीफन मला म्हणाला,''कृपाल माझेदेखील गुरू आहेत. परंतु तू इतके रूदन का करीत आहेस? त्यामुळे तुझे डोळे खराब होतील.'' मी त्यास म्हणालो,''ही माझ्या आवाक्यातील गोष्ट नाही, प्रत्येकाच्या आपआपल्या वेदना असतात.'' खरोखरच तीन महिन्यानंतर माझे डोळे खराब झाले, मला त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली.

सतगुरू कृपालजींशिवाय इतर कुणीही माझ्या अंतरातील जन्म-मरणाची वेदना शमवली नाही. रात्रं-दिवस माझे हेच मागणे होते की काहीही करून माझी कृपालजींशी भेट व्हावी! बालपणापासूनच माझ्या अंतरात परमात्मा प्राप्तीची ओढ होती. मी सहा वर्षांचा होतो, तेव्हाच माझ्या आई-वडिलांना सांगून टाकले होते की मी या जगात तुमच्यासाठी आलेलो नाही. बालपणा पासूनच मी माझ्या आयुष्यात चार तासांपेक्षा अधिक वेळ झोपलेलो नाही.

ज्या दिवसापासून मी कॅनडामध्ये आलो आहे, त्या दिवसापासून आतापर्यंत एक मिनिटदेखील झोपलेलो नाही. तुम्ही आश्चर्यचकित झाला असाल की न झोपल्याने माझी स्थिती कशी असेल? परंतु झोप नसल्याने माझे डोळे वा शरीर जड झालेले नाही, माझ्यावर न झोपल्याचा काही परिणाम झालेला नाही. सर्व शक्तिमान परमात्मा कृपाल माझ्या आश्रमात आले असता मी त्यांची विनवणी केली की,''तुम्ही पीरांचे पीर आहात. तुम्हांस माझ्यासारखे लाखो भेटतील, परंतु तुमच्यासमान मला कुणीही दुसरा संपूर्ण जगात सापडणार नाही.'' मी अश्रु ढाळत त्यांना विनंती केली,''हे सर्व शक्तिमान कृपाल! जर का माझ्या गुन्ह्यांच्या यादीचा कागद तुम्ही उघडून पाहिलात

तर मी तुमच्या द्वारी उभा राहण्याच्या लायकीचा देखील नाही.'' पुढे मी रडत-रडत तसेच हसत असेही म्हटले,''जर मी अपराधी नसतो तर तुम्ही माफ तरी कुणाला केले असते, तुम्हांस क्षमावान कोणी म्हटले असते?'' मी तुमचा तिळा-तिळाचा अपराधी आहे, कणा-कणाचा चोर आहे; क्षणोक्षणी गुन्हे करणारा आहे. असे असूनही तुम्ही माझे अवगुण माफ करा.''

मी हुजूरांपुढे विनवणी केली की मी निरुपयोगी व टाकाऊ होतो, तुमच्या शिवाय माझे एक कवडी मुल्य देण्यासही कुणी राजी नव्हते. परंतु परमात्मा कृपाल या शरीरामध्ये प्रगट झाल्यानंतर हा देह अनमोल झाला. गुरू धारण करण्यासाठी मी सर्वत्र फिरलो, अनेक मठांमध्ये व गुरूद्वारांमध्ये गेलो. मी परमात्मा कृपालजींना म्हटले,''हे पातशाह! मी जर इतर कुणाचा शिष्य झालो असतो तर भक्ती-धनाशिवाय मी कंगाल राहिलो असतो.''

हुजूर कृपालजींकडून मी सांसारिक धन-संपत्ती वा मुला-बाळांची वा इतर कोणतीही मागणी केली नाही. बालपणापासूनच माझी बुद्धी, माझे हृदय रिक्त होते. ज्या जमीन-जुमल्यासाठी लोकं भांडण-तंटा करतात, तितकी जमीन माझ्या वडिलांच्या घरी होती. जग धन-संपत्तीच्या मागे-मागे पळत असते परंतु मला या बाह्यजगातील धन-संपत्तीची गरज नव्हती. माझे सतगुरू सर्वशक्तिमान कृपालजींनी भक्तीचे धन देऊन मला तृप्त केले.

जेव्हा हुजूर कृपालजींनी मला जमिनीखाली ध्यान-अभ्यासासाठी बसविले, तेव्हा जग मला टोमणे मारू लागले, वेडा म्हणू लागले. अमृतसर येथील इस्पितळात वेड्यांवर उपचार केला जातो. अनेक लोकांनी माझ्या कुटुंबियांना सल्ला दिला की यास अमृतसर येथील वेड्यांच्या इस्पितळामध्ये नेऊन वीजेचे झटके द्यावेत, जेणेकरून याची बुद्धी ठिकाणावर येईल. अनेक लोकं म्हणत की, दिल्लीवाल्या कृपालने याच्यावर जादुटोणा केला आहे. परंतु त्यांना मी प्रेमाने म्हणत असे:

***कृपाल सिंह नू सिमर के पापी तरे अनेक।***
***कहे अजायब न छोड़िए कृपाल सिंह की टेक।।***



कृपाल सिंहजींचे चिंतन केल्याने अनेक पापी तारले गेले. अजायब तुम्हा सर्वांना प्रेमाने सांगत आहे की तुम्ही देखील कृपालजींना शरण जा, त्यांच्याकडून नामदान घ्या. हे ऐकून लोकं शांत होत आणि विचार करीत की याला तर कृपालच कृपाल प्रिय आहेत.

सर्वांच्याच शरीरात वसत असलेल्या सचखंडाचा स्वामी असलेल्या कृपालजींना माझी प्रार्थना आहे की माझा आत्मा, जीवन, देह, पिंड सर्वकाही कृपालजींचेच आहे. कारण मला येथे कोण ओळखत होते? हे सर्व कृपालजींचेच माहात्म्य आहे. तुमचेही कर्तव्य आहे की तुम्ही सर्वशक्तिमान कृपालजींच्या नामाचा जप करा आणि तुमच्या जीवनाची नौका या इहलोकातून पार करा.

***

# गुरूमत

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी
अमेरीका – ४ जुलै, १९८०

ही वाणी श्री गुरू रामदासजी महाराजांची आहे. गुरू रामदासजींनी या वाणीत हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे की कशाप्रकारे महान आत्मा जीवांना या दु:खमय जगातून काढून नेण्यासाठी येतात परंतु त्या आत्म्यांचा येथे विरोध केला जातो, त्यांच्यावर किती अत्याचार केले जातात? सांसारिक लोकं त्यांना सूळावर देखील चढवितात आणि वरून ते स्वत: योग्य असल्याचा दावा देखील करतात. या वाणीत त्या प्रेमी आत्म्यांची स्थिती देखील वर्णन केलेली आहे जे शब्द–नामाशी समरस होतात, ध्यान–अभ्यास–नामस्मरण करतात. त्यांना काय प्राप्त होते?

आपण सर्व या संतबानी आश्रमात पुढले बारा–तेरा दिवस या विषयावर सत्संगाची मालिकाच ऐकाल. या मालिकेवर एक पुस्तक छापून तयार होईल तसेच या सत्संग–मालिकेची टेप देखील आपणांस प्राप्त होईल. आपणांस समजेल की गुरूमत म्हणजे काय आणि गुरूमतात कोण येतात? गुरूमतात आलेल्या लोकांचीदेखील काळ कशा प्रकारे फसवणूक करतो जेणेकरून ते मनाच्या सांगण्यानुसार चालू लागतात. जे नामदान प्राप्त करूनही गुरूमतास सोडून जातात त्यांची काय परिस्थिती होते? आपण हे सर्व काही या वाणीत सविस्तर ऐकाल. जे सत्संगी असे म्हणतात की आम्ही संतमतात आलेलो आहोत, आम्ही नामदान प्राप्त केलेले आहे, तेव्हा आता आम्ही काहीही केले तरी आम्हांस त्याचा दंड मिळणार नाही, अशा लोकांनी ही वाणी लक्षपूर्वक ऐकावी. निसर्गाचा नियमच आहे की जो दुष्कर्म करतो त्यास त्या दुष्कर्माचे फळ भोगावेच लागते. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''काळ बिल्कुल गय करीत नाही, मग भले त्या दुष्कर्मांची परतफेड शिष्य स्वत: करो वा त्याचे गुरू करोत, परंतु मोबदला तर द्यावाच लागतो.''

आपणा सर्वांस पुढील पंधरा दिवस या वाणीच्या मालिकेत हे ऐकण्यास मिळेल की कोणीही रातोरात महात्मा बनत नाही. महात्मा केवळ शब्द–नामाची कमाई करूनच बनतात. परंतु ज्याने जन्मभर शब्द–नामाची कमाई केली, काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकाराशी झुंज दिली तो यशस्वी होतोच असे नाही. जर दहा लोकं असे म्हणू लागले की हा संत नाही, तर त्याचा आंतरिक मार्ग बंद होत नाही. ज्या मनुष्याने आयुष्यभर शब्द–नामाची कमाई केली नाही परंतु त्याच्या पार्टीतील दहा–बारा माणसे सांगू लागली की हा परिपूर्ण महात्मा आहे तरी देखील कोणाच्या सांगण्यामुळे एखादा मनुष्य महात्मा बनू शकत नाही. असे महान आत्मा सचखंडातून येतात, आपल्या जीवनात सर्व संसारापुढे आदर्श उदाहरण ठेवण्यासाठी ते परिश्रमाची पराकाष्ठा करतात व पुष्कळ ध्यान–अभ्यास–नामस्मरण करतात.

महात्मा सत्संगातही कोणाची निंदा करीत नाहीत तसेच व्यक्तीश:देखील कोणाची निंदा करीत नाहीत. त्याचप्रमाणे ते आपल्या सेवकांनादेखील इतर कोणाची निंदा करण्यास सांगत नाहीत. निंदा केल्याने आपण आपले जीवन मलिन करीत असतो, इतरांच्या पापकर्मांचे ओझे स्वत:वर घेत असतो.

गुरू अमरदेवजी महाराजांनी वृद्धावस्थेतही गुरू अंगददेवजी महाराजांची सेवा केली. त्यांच्या अंत:करणात अत्यंत गुरू–विरह व तळमळ होती. जेव्हा गुरू अंगददेवजींनी देहत्याग केला तेव्हा त्यांची मुले दातू आणि दासू यांनी गुरू अमरदेवजींचा खूप विरोध केला. एकदा गुरू अमरदेवजी सत्संग करीत होते तेव्हा दातू आणि दासू यांनी त्यांना लाथ मारली की तुम्ही आमच्या घरचे नोकर असून गुरू–गादीचे वारस कसे बनू शकता?

गुरू अमरदेवजी महाराजांमध्ये कमालीची नम्रता होती, ते स्टेजवरून खाली आले व त्यांचे पाय चेपू लागले की माझे वृद्ध हाडगळ शरीर आहे, तुमच्या पायास वेदना झाली असावी. या, मी तुमचे पाय चेपून देतो. तुम्हीच गुरू–गादी सांभाळा.

गुरू अमरदेवजी तेथून गुरू-गादी सोडून निघून गेले. ते घोड्यावर सतरंज्या लादून जाऊ लागले असता त्यांना वाटेत चोर भेटले. त्या चोरांनी त्यांच्या सतरंज्या हिसकावल्या. जेव्हा ते गोइंदवाल नामक गावी आले तेव्हा तेथील चौधरी गोंदे मरवाह याने त्यांचा खूप विरोध केला.

जेव्हा गुरू अमरदेवजींनी गोइंदवाल येथे आपला सत्संग चालू केला तेव्हा तेथे एक तपा योगी होता. तपा योगीच्या हृदयात त्यांच्याप्रती ईर्ष्या निर्माण झाली कारण जो मनुष्य एकदा का गुरू अमरदेवजींचा सत्संग ऐकत असे तो त्यांचाच होऊन जात असे. तपा योगीला उणीव भासू लागली की लोकांनी त्यास महात्मा मानणे सोडून दिले आहे. ईश्वराच्या मर्जीनुसार त्या गावात पाऊस पडत नव्हता. त्यावेळी गावात दुष्काळ पडलेला होता. तपा योगीने चौधरी गोंदे मरवाहचे कान भरले की जर अमरदेवजींना गावाबाहेर काढले तर पाऊस पडू शकेल, कारण हा देवी-देवतांना मानत नाही तर मग पाऊस कसा पडेल?

संत तर परमेश्वराच्या मर्जीत राहण्यातच आनंद मानतात. तेथील लोकांनी गुरू अमरदेवजींना विनंती केली की महाराजजी, पाऊस पडला नाही. तपा योगीने या गोष्टीचा फायदा घेऊन म्हटले आहे की जर तुम्ही अमरदेवजींना गावाबाहेर काढले तर पाऊस पडू शकतो. तुम्ही ग्रामणी जट (शेतकरी) लोकांना जाणताच. शेतकरी गुरू अमरदेवजींकडे जाऊन स्वत:च्या स्वार्थाच्या गोष्टी करू लागले की जर तुम्ही या गावातून निघून गेलात तर गावात पाऊस पडू शकेल.

गुरू अमरदेवजी महाराज परमेश्वराच्या मर्जीनुसार राहण्यात खूष होते. ते म्हणाले, मी गेल्याने तुमचा फायदा होत असेल तर मी इथून निघून जातो. नामाची कमाई केलेल्या महात्म्यांना त्या गावातून आपले गाठोडे उचलून निघून जावे लागले. नंतर तेथे जेठा भाई आले व विचारू लागले की गुरू साहेब कुठे आहेत? तिथल्या एका माणसाने जेठा भाईंना सांगितले, तपा

योगीने विदान केले आहे की जर गुरू अमरदेवजींना या गावातून काढून टाकले गेले तर येथे पाऊस पडेल, म्हणून गुरू साहेब येथून निघून गेले.

जेठा भाई खूप नामाची कमाई केलेला सत्संगी होता. जेठा भाईने विचारले, इतके करूनही पाऊस तर पडला नाही. त्याने म्हटले, ज्या शेतात तपा योगीच्या मांसाचा कण देखील पडला तर तेथे पाऊस पडेल. शेतकऱ्यांनी आपल्या स्वार्थाचाच विचार केला. कोणी योगीस म्हणाला की तू आमच्या शेतात चल तर दुसरा म्हणाला की तू अगोदर आमच्या शेतात चल. कोणीही मागचा–पुढचा विचार केला नाही, कोणी योगीचा हात धरून खेचू लागला तर कोणी त्याचा पाय खेचू लागला. बिचारा योगी खेचाखेचीत मृत्यु पावला. त्यास ज्या शेतात नेले तेथे पाऊस पडला.

त्यानंतर गुरू अमरदेवजींनी गावा बाहेर काही मैल दूर असलेल्या एका घरात जाऊन आतून दरवाजा बंद केला व त्यावर लिहून ठेवले की कोणीही दरवाजा उघडू नये, मी कोणासही भेटू इच्छित नाही. नामाची कमाई केलेल्या महात्म्याकडून जर लोकं पारमार्थिक फायदा घेत नाहीत तर अनेकदा महात्मा गप्प देखील होतात. भाई गुरुदास, बाबा बुड्डा आणि काही लोकांनी मिळून घरामागची भिंत तोडून दरवाजा उघडला. गुरू अमरदेवजींनी जेठा भाईला दर्शन दिले नाही, ते जेठा भाईकडे पाठ करून बसले. जेव्हा जेठा भाईने दर्शनासाठी विनंती केली तेव्हा गुरू अमरदेवजी म्हणाले,''मी तुला रिद्धी–सिद्धी दाखविण्यासाठी सांगितले नाही. मी परमेश्वराच्या मर्जीत खूष आहे.'' त्याने माफी मागितली तेव्हा गुरू अमरदेवजींनी त्याच्या दिशेने आपली बाही केली. आता तेथे अक धर्मस्थान स्थापन झालेले आहे, ज्यास सन्न साहेब म्हटले जाते. त्यानंतर गुरू अमरदेवजींनी लोकांना नामदान दिले व मुक्ती मार्गाच्या अभ्यासाचे ज्ञान दिले. गुरू अमरदेवजी महाराजांनंतर गुरू रामदासजी गादीवर बसले. गुरू रामदासजींनी या वाणीत त्या सर्व प्रसंगांचा उल्लेख केलेला आहे जे गुरू अमरदेवजींच्या बाबतीत त्या गावात घडले.




काळाने सत्पुरुषाकडून अनेक वर घेतलेले आहेत. त्यातून एक वर हा देखील आहे की संत जेव्हाही जगात येतील तेव्हा त्यांनी चमत्कार दाखवू नयेत. जर संत चमत्कार दाखवू लागले तर एकाच महात्म्याचे या जगात येणे पुरेसे होईल. महात्म्यासाठी एखाद्या अंध व्यक्तीस डोळा देणे किंवा लुळ्या मनुष्यास पाय देणे किरकोळ गोष्ट आहे, परंतु महात्मा तसे करीत नाहीत.

काळाने हा देखील वर घेतलेला आहे की मी ज्या जीवास जेथे जन्म देईन तेथे त्याने स्वखूषीने रहावे. डुकराची योनी सर्वात कठीण असते, तरीही तो या संसारास सोडू इच्छित नसतो. काळाने हा देखील वर घेतलेला आहे की कोणासही गेल्या जन्माच्या गोष्टींची आठवण नसावी की, मी जे सुख प्राप्त करीत आहे ते कोणत्या कर्माचे फळ आहे व मी जे दु:खं भोगत आहे ते कोणत्या पाप कर्माचे फळ भोगत आहे.

संत महात्मा जगात येऊन कोणासही शाप किंवा वर देत नाहीत. कधी कधी अत्तराच्या बाटलीचे झाकण उघडे रहाते व ज्यांची ग्रहणशक्ती चांगली असते त्यांना त्याचा सुगंध येतो. ते त्यांच्यापासून फायदा घेतात. महात्मा कधीही जाहिररित्या चमत्कार दाखवित नाहीत.

**सतिगुरु पुरखु दइआलु है जिस नो समतु सभु कोइ।**

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''जेव्हा परमात्मा जावात्म्यांना तारू इच्छितो तेव्हा तो आपल्या शक्ती आणि कलेचा संचय एखाद्या मनुष्याच्या आत ठेवतो. गुरू एका बाजूने परमात्म्याशी जुडलेले असतात आणि दुसऱ्या बाजूने जगाशी जुडलेले असतात. गुरू आपणांस परमात्म्याचा संदेश देतात. ज्याप्रमाणे पिता आपल्या मुलांस पहातो त्याप्रमाणे गुरू संगतला पहातात.''

गुरूंच्या दृष्टीत मित्र आणि शत्रू एकसमान असतात. गुरू नामाची कमाई करूनच या स्थानावर पोहचलेले असतात की त्यास पाना-पानात तसेच सर्व जावांच्या अंतरात परमात्मा दिसतो. गुरू सर्वांना परमात्मा समजूनच प्रेम करतात. त्यांस पूर्ण ज्ञान असते की कशा प्रकारे परमात्मा जगात सामावलेला आहे आणि जगास कोणत्या दृष्टीने पहावे.

जेव्हा आपला आत्मा मन-इंद्रियांच्या पातळीहून वर निघून जातो तेव्हा त्याची परमात्म्याशी भेट होते. त्यावेळी जर आपण त्या उंच पातळीवरून खाली जगाकडे पहातो तेव्हा या गोष्टीचा उलघडा होतो की सर्वत्र परमात्म्याचीच शक्ती कार्यरत आहे. पशू-पक्षांमध्ये देखील परमात्मा आहे, प्रत्येक ठिकाणी परमात्मा आहे. जेव्हा आपण मन-इंद्रियांच्या पातळीवरून दोषैकदृष्टीने पहातो तेव्हा आपणांस निरनिराळ्या चेहऱ्यांचे मनुष्य दृष्टीस पडतात, विविध धर्मिय दृष्टीस पडतात. परंतु मन-इंद्रियांच्या पातळीहून वर गेल्यानंतर आपणांस जाणीव होते की कशा प्रकारे आपण एकमेकांशी घृणा करीत आहोत, एकमेकांवर दोषारोप करीत आहोत. गुरू साहेब सांगतात:

***बुरा भला तिच्चर आखदा जिच्चर है दो माहें।गुरूमुख ईक पछांणेया इक्को माहें समाहे।।***





## एक द्रिसटि करि देखदा मन भावनी ते सिधि होइ।

आपण सांगता,''गुरू सर्वांना समदृष्टीने आणि एकाच भावनेने पाहतात, परंतु आपण गुरूंपासून केवळ आपल्या ग्रहणशक्तीला अनुसरूनच लाभ घेऊ शकतो. एका बापाचे दोन मुलगे असतात, एक मुलगा पित्याचे सांगणे ऐकून शाळेत जातो, तेथे आपल्या शिक्षकाने सांगितलेले ऐकतो तेव्हा त्याची सुप्त विद्या जागृत होते. दुसरा मुलगा ना आपल्या पित्याचे सांगणे ऐकतो व ना शाळेतील शिक्षकाने सांगितलेले ऐकतो, त्यामुळे तो अशिक्षितच रहातो. एक मुलगा शिकून-वाचून हुशार बनतो व सुखाचे जीवन व्यतीत करू लागतो तर दुसरा मुलगा अशिक्षित असतो व अशिक्षितच रहातो. एक पास होतो तर दुसरा नापास होतो. ते दोघेही एकाच पित्याची मुले असतात.''

*मनमुख और गुरमुख दा हो नहीं सकदा मेल।*
*वक्खो वक्ख दोहां दा रस्ता ज्यों पानी ते तेल।*
*ईक डोबे दूजा तारे ऐह है अजब प्रभु दा खेल।*
*ईक बाप दे दो पुत्र ईक पास ते दूजा फेल।।*

## सतिगुर विचि अंम्रितु है हरि उतमु हरि पदु सोइ।

संत–सतगुरूंनी अत्यंत मेहनतीने स्वतःच्या अंतर्यात नाम प्रगट करून घेतलेले असते. सतगुरूंनी आपल्या जीवनाचा बहुतांश भाग भक्तीत व्यतीत केलेला असतो. भक्ती आणि नाम त्यांच्या अंतर्यात प्रगट असते, खरेतर ते अमृत असते. तेच अमृत आपणांस ग्रहण करणे गरजेचे असते. त्यांच्या अंतरात जी नाम–भक्तीची पुंजी असते त्याचा कधीही नाश होत नाही. तिच अंतसमयी आपल्या सोबत जाईल, तेच आपले संगी–साथी आहेत.

संत जोपर्यंत देहरूपात असतात तोपर्यंत ते कधीही असे सांगत नाहीत की आम्ही तुमचे गुरू–पीर आहोत. ते सांगतात शब्द–नामच आपले गुरू–पीर आहेत. ते कधीही शिष्यांस त्यांच्या देह–बंधनात अडकवित नाहीत, ते केवळ शिष्यांना शब्द–नामाशी जोडतात. या जगात ना गुरूंचा देह रहाणार आहे ना शिष्याचा देह रहाणार आहे. गुरूंचे स्वरूप शब्द असून शिष्याचे स्वरूप सुरत आहे.

जरी गुरूंनी शिष्यास नाम देऊन लगेच आपला देहत्याग केला तरी ते सेवकासाठी सदैव जीवित असतात. सेवकास इतर कोणताही गुरू धारण करण्याची गरज नसते. फरक केवळ हाच असतो की सेवकांना गुरूंच्या स्थूल शरीराच्या दर्शनाचा जो लाभ मिळत असतो, ते त्या लाभापासून वंचित रहातात. गुरूंच्या जागी जो उत्तराधिकारी असेल त्याचा सत्संग ऐकावा. जर एखादा प्रश्न असला किंवा अंतर्यात जाण्याबाबत काही अडचण असली तर त्याबद्दल त्या उत्तराधिकाऱ्यास सेवक विचारू शकतो. जे सतगुरू देहत्याग करून गेलेले असतात ते नवीन शिष्य बनवू शकत नाहीत. नवे शिष्य केवळ जीवित महापुरुषच बनवू शकतात.

**नानक किरपा ते हरि धिआई ऐ गुरमुखि पावै कोइ।**

गुरू साहेब सांगतात,''जेव्हा परमात्मा आपल्यावर कृपा करतो तेव्हाच आपण परिपूर्ण महात्म्यांच्या चरणी पोहचू शकतो. जेव्हा महात्मा आपल्यावर कृपा करतात तेव्हाच आपण शब्द–नामाशी जुडतो.''

## हउमै माइआ सभ बिखु है नित जगि तोटा संसारि।
## लाहा हरि धनु खटिआ गुरमुखि सबदु वीचारि।

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''आपल्या आणि परमात्म्यामधील सर्वात मोठा अडथळा हा मी–मोठेपणा–अहंकाराचाच असतो. आपण रात्रं–दिवस माया गोळा करण्यात मग्न आहोत. कितीही माया जमा केली तरी ना आजपर्यंत कोणीही तृप्त झालेला आहे आणि ना कधी तृप्त होऊ शकेल. माया वृक्षाच्या सावलीप्रमाणे असते, आज ती इथे असेल तर उद्या ती दुसऱ्या जागी असते. कितीही माया जमविली तरीही आपणांस आयुष्यभर मायेची उणिवच भासते. परमेश्वराने आपणांस सकल जगाची धन–संपत्ती जरी दिली तरी आपण मायेसाठी भुकेलेलेच असतो.'' गुरू नानक साहेब सांगतात:

***भुखया भुख न उतरी बन्ना पुरियां भार।***

महात्मा नामाचा लाभ कमवून जातात आणि आपल्या सेवकांनादेखील शब्द–नामाची कमाई करण्याचा उपदेश देतात.

## हउमै मैलु बिखु उतरै हरि अंम्रितु हरि उर धारि।

आपण शब्द–नामाची कमाई करणे का गरजेचे आहे? परमात्मा आणि आपल्यामध्ये मी–मोठेपणा–अहंकाराचा अडथळा आहे, त्यास आपण शब्द–नामाच्या कमाईने नष्ट करू शकतो.

## सभि कारज तिन के सिधि हहि जिन गुरमुखि किरपा धारि।

आपण सांगता,''शब्द–नामाची कमाई केल्याने ना आपल्या देहात एखादा दोष निर्माण होतो व ना आपल्या व्यवसायात नुकसान होते. खरेतर आपण जर शब्द–नामाची कमाई केली तर आपला व्यवसाय उत्तम रितीने चालत रहातो. आपण जे कार्य आरंभ करतो ते सफल होते.''

## नानक जो धुरि मिले से मिलि रहे हरि मेले सिरजणहारि।

आपण सांगता,''ज्यांना परमात्म्याने निवडलेले असते त्यांनाच शब्द-नामाचे दान प्राप्त होते. ते सदैव नामाशी जुडून राहतात आणि शब्द-नामाची कमाई करीत राहतात.''

## तू सचा साहिबु सचु सचा गोसाई।

गुरू रामदासजी सांगतात,''हे परमात्मा, तू सच्चा आहेस. येथे सच्चा याचा अर्थ असा की ज्याचा कधीही नाश होत नाही. तू युगायुगांतरापासून अस्तित्वात आहेस, तू सकल जगाचा दाता आहेस, सर्वांचा स्वामी आहेस.''

## तुधु नो सभ धिआइदी सभ लगै तेरी पाई।

आता आपण सांगता,''हे परमात्मा, सर्व तुझी भक्ती करतात, तुझे स्तुतिस्तोत्र गातात. जे तुझी स्तुती करतात तेच उत्तम आहेत, तेच आपल्या निजधामास पोहचतात. पशू-पक्षीदेखील आप-आपल्या बोलीत त्या परमात्म्याचे आभार मानतात.'' फरीद साहेब सांगतात:

***हौं बलिहारी तिन पंछियां जंगल जिन्हां वास।***
***कंकर चुगन थल वसन रब न छड्डुन पास।।***

आपण रोजच पहातो की पक्षी आपण उठण्यापूर्वीच आप-आपल्या बोलीत परमात्म्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. मनुष्यास उत्तमात-उत्तम खाद्यपदार्थ ग्रहण करण्यास मिळतात, तरीही तो परमात्म्याचे आभार मानत नाही, कृतज्ञता व्यक्त करीत नाही. तो जरी पहाटे उठला तरी परमात्म्यावर उपकार केल्याप्रमाणे दाखवितो. कधी म्हणतो गुडघे दुखतात तर कधी म्हणतो घोटे दुखतात तर कधी आणखी निराळी कारणे सांगतो. फरीद साहेब सांगतात की पक्षांना चांगले अन्न मिळत नाही तरीही ते पहाटे सर्वांपेक्षा आधी उठून परमात्म्याचे स्मरण करतात.

## तेरी सिफति सुआलिउ सरूप है जिनि कीती तिसु पारि लघाई।

आता आपण सांगता,''हे परमात्मा, तुझी स्तुती अत्युत्तम आहे. जे तुझे स्तुतिस्तोत्र गातात ते या ऐहीक जगात फसून रहात नाहीत, ते संसाररूपी समुद्रापार होतात. महात्मा आपणांस समजावतात की जर आपले गुरूंशी प्रेम असेल तरच आपण गुरूंची स्तुती करू शकतो, नाहीतर आपण जगाची स्तुती करण्यात कार्यमग्न असतो कारण आपले प्रेम जगाशी जडलेले आहे. परंतु मृत्युसमयी हे जग आपल्या सोबत जाणार नाही.''

**गुरमुखा नो फलु पाइदा सचि नामि समाई।**

गुरूमुख उठता-बसता, झोपेत-जागृतावस्थेत परमात्म्याचे स्तुतिस्तोत्र गाण्यातच निमग्न असतात. परमात्मा त्यांना त्या स्तुतिस्तोत्र गाण्याचे असे बक्षिस देतो की त्यांना आपल्या भवनात स्थान देतो, त्यांना शाबासकी देऊन त्यांस छातीशी धरतो आणि त्यांना प्रेम करतो.

**वडे मेरे साहिबा वडी तेरी वडिआई।**

आता आपण सांगता,''तू सर्वश्रेष्ठ आहेस, सर्वांचा दाता आहेस. तुझी स्तुतीदेखील सर्वोच्च आहे. जे तुझी स्तुती करतात ते देखील श्रेष्ठ होतात.''

**विणु नावै होरू सलाहणा सभु बोलणु फिका सादु।**

गुरू रामदासजी सांगतात,''नाम-रसा शिवाय, शब्द रसा शिवाय आणि गुरूंच्या स्तुतीशिवाय आपण जी काही जगाची स्तुती करीत असतो किंवा सांसारिक गोष्टींबद्दल गप्पा मारतो, त्यामुळे आपले तोंड बेचव होते, त्यापासून येणारा स्वादही बेचव असतो व ते ऐकणारे आपले कानही नीरस होतात.''

**मनमुख अहंकारू सलाहदे हउमै ममता वादु।**

आपण सांगता, मनमुख भक्तीमार्गावर चालू जरी लागले तरी त्यांच्या अंतरात खूप अहंकार असतो. ते अहंकारात बुडालेले असतात. ते जे काही करतात ते अहंकारातच करतात.'' महाराज सावन सिंहजी सांगत असत:

*किया कराया सब गया जब आया अहंकार।*

काहीही करून त्यावर अहंकार करणे म्हणजे आपण स्वादिष्ट पुलाव बनवून त्यावर राख घालण्यासमान आहे.

**जिन सालाहनि से मरहि खपि जावै सभु अपवादु।**

मनमुख सांसारिक गोष्टींची स्तुती करण्यात मग्न असतो की मी इतकी प्रगती केली, इतके मतब्बर व्यक्ती माझे नातेवाईक आहेत. शेवटी एके दिवशी आपण त्यांस सोडून निघून जाऊ किंवा ते आपल्याला सोडून या जगातून निघून जातील.

**जन नानक गुरमुखि उबरे जपि हरि हरि परमानादु।**

आता आपण सांगता,''गुरूमुख लोक परमात्म्याची भक्ती करतात, परमात्म्याचे गुणवर्णन करतात, शब्द-नामाचा महिमा गातात, म्हणूनच ते या संसाररूपी समुद्रापार जातात.''

**सतिगुर हरि प्रभु दसि नामु धिआई मनि हरी।**

सतगुरू स्वत:हून या संसार मंडळावर येऊन आपणांस सांगतात की नामाची कमाई करा. आपला आत्मा जन्मजन्मांतरापासून उपाशी आणि तहानेने व्याकूळ आहे, त्यास नामरसाने तृप्ती मिळेल.

**नानक नामु पवितु हरि मुखि बोली सभि दुख परहरी।**

ते येऊन आपणांस सांगतात की,''नाम पवित्र असून ज्याच्या अंतर्यात नाम स्थिरावते तो देखील पवित्र बनतो. जे नामाची कमाई करतात ते देखील पवित्र होतात. नाम केवळ शब्दाचा संच नाही, नाम ध्यान आहे, नाम शक्ती आहे.'' कबीर साहेब सांगतात:

*नाम जपत कोड़ी भला चौं चौं पए जिस चाम।*
*कंचन देह किस काम की जे मुख नाहीं नाम।।*

**तू आपे आपि निरंकारु है निरंजन हरि राइआ।**
**जिनि तू एक मनि सचु धिआइआ तिन का सभु दुखु गवाइआ।**

आता गुरू रामदासजी महाराज परमात्म्याचा महिमा वर्णितात,''तू मायेपासून रहित आहेस, तू सकल जगाचा स्वामी आहेस. जे तुझी भक्ती करतात ते जन्म-मरणाच्या चक्रनेमिक्रमाच्या पलिकडे पोहचतात.''

**तेरा सरीकु को नाही जिस नो लवै लाइ सुणइआ।**

आता गुरू रामदासजी महाराज सांगतात,''हे परमात्मा, तुझा या जगात कोणी प्रतिनिधी नाही ज्यास जाऊन आम्ही काही सांगू शकू. आम्ही तुझ्यासमोर नतमस्तक होऊनच लाभ घेऊ शकतो.''

**तुधु जेवडु दाता तू है निरंजना तू है सचु मेरै मनि भाइआ।**
**सचे मेरे साहिबा सचे सचु नाइआ।।**

आता आपण सांगता,''हे परमात्मा, तू दाता आहेस, दयावंत आहेस, तू जीवांवर खूप दया करतोस. जीवांच्या अंतरात तू स्वत:च रुची निर्माण करतोस, आतूनच जीवांना प्रेरित करतोस आणि महात्म्यांकडे पाठवितोस. यामध्ये महात्मा शिष्यापासून किती दूर अंतरावर राहतात याचा प्रश्न नसतो. तू ज्यांच्या अंतरात बसून प्रेरणा देतोस ते हजारो मैल दूरचा प्रवास करून येऊन नाम घेऊन जातात. तू ज्यांना अंतरातून प्रेरणा देत नाहीस ते महात्म्यांच्या निकट जरी बसलेले असले तरी त्यांस नाम मिळत नाही. तू ज्यांना दात देतोस त्यांना दात देऊन तुला पश्चाताप होत नाही, उलट तू दात देऊन खूष होतोस.''

***

# प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

**एक प्रेमी :** महाराजजी! काल तुम्ही सांगितले होते की १९४७ सालच्या हिंदू-मुस्लिम दंग्यामध्ये बाबा सावन सिंहजींनी बलिदान दिले होते, स्वत:चे रक्त सांडले होते. १९७१ सालाच्या भारत व पाकिस्तान यांच्या युद्धामध्ये महाराज कृपालजींनी बलिदान दिले. पंधरा दिवसांपूर्वी इंदिरा गांधींच्या हत्येनंतर ज्या घटना घडल्या त्यांचा तुमच्यावरदेखील परिणाम झाला होता, तुम्हीही रक्त सांडले. अशा तऱ्हेच्या घटनांचा तुमच्या जीवनावर काय परिणाम होतो, हे आम्ही जाणू इच्छितो. आम्हाला या गोष्टीची काळजी वाटते.

**बाबाजी :** तुम्हांस कल्पना आहे की संतमतामध्ये आपणांस चिंता, काळजी यांच्या पलिकडे जाण्यास सांगतात. कालच्या सत्संगाचा आशयही असाच काही होता. तुम्ही येण्यापूर्वी माझी प्रकृती अतिशय नाजूक अवस्थेमध्ये होती, मी अतिशय अशक्त झालो होतो. त्यामुळे आश्रमातील सर्व प्रेमीजन विचार करीत होते की विदेशी प्रेमींचा ग्रुप येणार आहे, आता कसे होईल? मी त्यांना म्हणालो की परमपिता कृपाल जाणतात की या शरीराद्वारे काम कसे करवून घ्यायचे? हा एक चमत्कारच आहे की पायऱ्या उतरताना मला मदतीची गरज पडली, परंतु जेव्हा खाली उतरून मी बसलो तेव्हा मलाच समजले काही की परमपिता कृपालजींनी माझ्या शरीरात कोणत्या प्रकारच्या शक्तीचा संचार करविला की मी तुमची सेवा करीत आहे. या ग्रुपमध्ये जास्त सत्संगी आहेत व मला बऱ्याच पत्रांची उत्तरेही द्यायची आहेत.

काल सत्संगामध्ये मी ज्याकाही गोष्टी सांगितल्या, त्याचा भावार्थ असा आहे की परमपिता कृपालजींद्वारे नाम घेतलेल्या एका मनुष्याचे पत्र दिल्लीहून आले होते. खरेतर त्या व्यक्तीची माझ्यावर श्रद्धा नाही, तो इतर दुसऱ्याच

ठिकाणी जातो. त्याने पत्रात लिहिले आहे की जितका वेळ महाराज कृपाल दिल्लीमध्ये होते, तोपर्यंत दिल्लीमध्ये काहीच गडबड झाली नाही. तुम्ही राजस्थानमध्ये राहत आहात. तेथे कुणी असे काही कृष्णकृत्य तर केले नाही ना, ज्याचे परिणामस्वरूप दिल्लीमध्ये अशा घटना घडत आहेत? महाराज कृपाल दिल्लीमध्ये असताना असे काहीच घडले नाही. परंतु ते गेल्यानंतर हे सर्व घडले आहे. ज्यांच्यावर आपली श्रद्धा आहे, त्यांच्याबद्दलही साशंकता आपल्या अंतरात निर्माण झालेली आहे. अशा अनेक गोष्टींचा माझ्यावर परिणाम झाला होता, ज्याचे वर्णन मी तुम्हा सर्वांसमोर केले.

महाराज सावन सिंहजींच्या बाबतीत मी सांगत असतो की त्यांच्यासोबत एकदा शिखांचे प्रसिद्ध अकाली नेता मास्टर तारा सिंह, मुधम सिंह नागो आणि आमचा आर्मी कमांडर एकत्र बसले होते. ते आपआपसांमध्ये गप्पा मारीत होते. कुणीतरी विचारले, महाराजजी, तुमच्या जन्मकुंडलीनुसार तुमचे १०० वर्षांचे आयुष्य आहे, हे सत्य आहे का? महाराज सावन म्हणाले, ''होय! हे सत्य आहे. परंतु हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा तुम्ही मला शांतपणे माझे कार्य करू द्याल. परंतु तुम्ही जर मला त्रासदायक, वेदना देणारी पत्रे लिहिलीत, तर मी लवकरच निघून जाईन. जास्त करून प्रेमीजन मला जेव्हा पत्र लिहितात, तेव्हा त्यांमध्ये त्यांच्या अडीअडचणी आणि दु:खांचाच उल्लेख असतो.'' महाराज सावन सिंहजींनी नव्वद वर्षे जीवनमान जगून हे जग सोडले, म्हणजे दहा वर्षे अगोदरच गेले. जे अभ्यासी ध्यान-अभ्यास करीत अंतरामध्ये जातात, त्यांना याची कल्पना आहे.

याचप्रमाणे महाराज कृपालजींच्या ध्यान-अभ्यास करणाऱ्या शिष्यांचा ठाम विश्वास आहे की महाराज कृपालजींनी त्यांच्या आयुर्मानापेक्षा चौदा वर्षे अगोदरच आपली इहलोकीची यात्रा संपवली. तुम्हाला कल्पना आहे की त्यांच्यावर अशा गोष्टींचे किती ओझे लादले जाते यात काही शंकाच नाही. जेवढा काळ ते येथे राहावयास हवे, तेवढा काळ ते राहिले नाहीत.

ज्या प्रेमीचे पत्र आले होते, त्याचे काल उत्तर लिहून, आज ते पत्र रवाना केले आहे. प्रियजनहो, संतांचा केवळ एकच धर्म वा एकच देश नसतो, तर सकल विश्वच त्यांचे घर असते. संसारी मुले तर दु:खी असतील तर त्यांचे सांसारिक वडिलदेखील त्यामुळे दु:खी होतात. संतांचे अंत:करण तर हजारे आई-वडिलांच्या अंत:करणाएवढे असते. परंतु मुले अशाप्रमाणे दंगा-मारामारी करतील, एकमेकांच्या रक्ताची होळी खेळत असतील, तर त्यांच्या वडिलांच्या अंत:करणाची अवस्था कशी असेल?

संतांना त्यांचा सेवक त्यांच्या समीप असो वा दूर, याचा काहीच फरक पडत नाही. ते नेहमीच, सेवक ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणी त्याचे संरक्षण करतात. ज्यांना त्यांनी नाम दिलेले आहे, त्यांचेच ते संरक्षण करतात असेही नाही. जगातील कोणत्याही कोपऱ्यातून कुणी त्यांचा धावा केला, तरीही संतांना त्या व्यक्तीची मदत करण्याची आज्ञा परमात्मानेच केलेली असते, कारण परमात्माच संतरूपात या ऐहीक जगात कार्यरत असतो. संत ना कधी चमत्कार करून दाखवितात, ना ते रिद्धी-सिद्धीची कधी मदत घेतात. परंतु दैवी शक्ती संतांचे स्वरूप धारण करून नक्कीच त्यावेळी आपल्या मुलांना मदत करते, यामध्ये कसलीच शंका नाही.

मी हे सर्व माझ्या मुखातून स्वत:ची स्तुती करण्यासाठी बोलत नाही, मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. १९७८ साली माझ्याशी भेट झालेल्या एका बेसत्संगी व्यक्तीचे मला पत्र आले आहे. एकदा भर उन्हाळ्यामध्ये आम्ही दिल्लीला जात होतो. वाटेमध्ये पाठी आणि ड्रायव्हर बर्फ विकत घेत होते. ते करताना त्यांना थोडा वेळ लागला. तेथे तो बेत्संगी मनुष्य अंदाजे शंभर फुट अंतरावर एका दुकानामध्ये बसलेला होता. तो तेथून उठून माझ्याजवळ आला. माझ्याप्रमाणेच चेहरा-मोहरा असलेला, दाढी राखलेला, माझ्याच वयाचा तो मनुष्य होता. माझ्याजवळ येऊन तो म्हणाला, ''तुमच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने मला आकर्षित केले आहे.'' मी माझ्या स्वभावानुसार

हसत–हसत त्याला म्हटले, ''बंधु! मी काही चुंबकासमान नाही की ज्याद्वारे मी तुला माझ्याकडे खेचले आहे.'' तो म्हणाला की खरे तर असे बोलणे तुम्हाला शोभत नाही, परंतु हेच सत्य आहे.

तो मनुष्य दिल्लीला त्याच्या एका नातेवाईकास भेटण्यासाठी गेला असता, तेथील गाड्यांच्या वाहतुकीमध्ये अडकला. लोकं दाढी धारण केलेल्यांचीच हत्या करीत होते. तो हिंदु–शिखांचा वाद नव्हता, तो तर चोरी–मारीचा वाद होता. लूटारूंनी धर्मांध व्यक्तींचे स्वरूप धारण करून एका विशिष्ट धर्माच्या लोकांना त्यांनी निशाणा केला होता. खरेतर तेथील हिंदूंनी शिख धर्मियांना त्यावेळी खूप मदत केली, त्यांचे रक्षण केले. दैवी शक्तीने एका दाढी नसलेल्या मनुष्याचे रूप धारण करून त्या बेसत्संगी मनुष्यास मदत केली व म्हटले तू गाडीच्या सीटखाली दडून बस, मी कार चालवितो. त्याने कार चालवित त्या मनुष्यास त्याच्या ठिकाणावर पोहचते केले. आपल्या ठिकाणावर पोहचल्यावर त्या बेसत्संगीने त्या मदत करणाऱ्यास विचारले, ''बाऊजी! तुमचा पत्ता काय आहे?'' तो मनुष्य म्हणाला,''तुला पत्ता देण्यासाठी माझ्याकडे वेळ नाही. काय माहित, मला अजून अनेक ठिकाणी जाऊन किती लोकांना मदत करायची आहे.''

अखेरीस त्या मनुष्यास ती वेळ आठवली. त्याच्याकडे माझा पूर्ण पत्ता नव्हता, परंतु त्याने अंदाजे पत्ता लिहून पत्र पाठविले. राजस्थानमध्ये सर्वजण मला ओळखतात, त्यामुळे फक्त संतबानी किंवा १६पी.एस. लिहिले असेल, तरीही पत्र माझ्याकडे पोहचते. मग भलेही त्यास अधिक वेळ लागो. त्या मनुष्याने सत्संगास येण्याची परवानगी मागितली आहे. तुम्हीच पहा! दैवी शक्ती कुणाच्यामार्फत वजन उचलते, दैवी शक्ती संरक्षण करते, परंतु त्यामध्ये ती स्वत:स गोवत नाही. इतर कुणाच्या मदतीने आपले काम करते.

ज्या दिवशी येथून ग्रुप गेला, त्या दिवशी १६ पी.एस. पासून सिरसापर्यंत मी गेलो. मी हिंदुंच्या गावांमधूनही गेलो, परंतु मला भय वाटले नाही. मला

माहित होते की तेथे माझे बांधवच उभे आहेत. ग्रुपच्या बसपुढे माझी गाडी जात होती. मी जेव्हा सिरसावरून १६ पी. एस. कडे मागे वळलो, तेव्हा अतिशय विश्वासाने मी पप्पुस म्हटले, ''मला पूर्णपणे विश्वास आहे की तुम्ही सर्वजण सुखरूप दिल्लीस पोहचाल. परमात्मा कृपालनी माझ्यावर कृपा करून त्या सर्वजणांना सुरक्षितपणे पोहचविले.''

मी ३० तारखेच जेवलो होतो. तसा देखील माझा आहार अतिशय कमीच आहे. लहापणापासूनच मला काजू, बिस्किट वा अधिक फळे खाण्याची सवय नाही. मी त्या दिवसांपासून अर्धा छटाक दुध पित असे. ते देखील प्यायलो नाही, केवळ थोडाचा चहा पिऊनच गुजराण करीत होतो. कालच पप्पुस मी सांगितले की मी आज आंबा खात आहे. त्या परमात्मारूपी शक्तीनेच मला अंतरामध्ये आधारही दिला आणि या शरीरामध्ये बसूनच या जिवांची अंतर्यात मदतही केली.

इंदिरा गांधी चांगली होती, प्रत्येक धर्मावर तिचे प्रेम होते. देशामध्ये एकता नांदण्यासाठी तिने खूप कार्य केले. परंतु तिचा विश्वासघात केला गेला. कोणत्याही धर्मातील सर्वच माणसे वाईट नसतात. हिंदुस्थानातील सर्वोच्च स्थानावर शिख व्यक्तीच विराजमान आहे. आपल्या देशाचे राष्ट्रपतीही शिखच आहेत. कल्पना नाही की दोन माथेफिरू माणसांनी इंदिरा गांधींचा विश्वासघात का केला? कबीर साहेब सांगतात:

***जो प्रभ किए भगत ते बाहंज तिन ते सदा डराने रहिए।***

एकदा मोहम्मद साहेब त्यांच्या सेवकांसमवेत बसले होते. काही लोकांनी त्यांच्या एका सत्संगीची तक्रार केली की याच्यात अमुक एक दोष आहे व तो दुष्कर्म करूनही तुमच्या शेजारी बसला आहे. मोहम्मद साहेब न्यायी होते. सर्व संतांना न्याय पसंत असतो. मोहम्मद साहेब म्हणाले,''जी लोकं कुणाच्या पोटात सूरा भोसकतील, कुणाचा विश्वासघात करतील, जी लोकं इतरांचा

ऐवज लुटतील वा जे लोकं स्वत:ची पत्नी सोडून व्यभिचार करीत फिरतील, अशा लोकांची मी हमी भरणार नाही.''

मोहम्मद साहेब जेव्हा अशा सत्संगींची निर्भर्त्सना करीत होते, तेव्हा ईमाम लोकं म्हणाले की, आज आम्हांस मोठ्या प्रमाणात सत्संगींची गरज आहे. यास तुम्ही कलमा दिलेला आहे, तो सत्संगी आहे, यास अशाप्रकारची शिक्षा देऊ नका. मोहम्मद साहेब म्हणाले,''मी चोर मुसलमानांचा आणि भोंदू शिष्यांचा गुरू नसून मी सत्यवादी लोकांचा गुरू आहे.''

मुसलमान लोकं डुकरास मारत नाहीत, तर हिंदु लोकं गाईचे रक्षण करतात. जेव्हा गुरू नानकजींना याबद्दल प्रश्न विचारले गेले तेव्हा ते म्हणाले:

***हक पराया नानका उस सूर उस गाय।***
***गुरु पीर हामां तां भरे जे मुरदार न खाए।।***

जे लोकं इतरांच्या हक्काचे खात नाहीत, त्यांचीच हमी मी देईन, मग भले ते हिंदु असोत वा शिख असोत कारण संतांचे सेवक सर्वच असतात.

ज्याप्रकारे दिल्लीमध्ये आता रक्तरंजित होळी खेळली गेली, तिच्यावर लवकरच नियंत्रण केले गेले, परंतु जेव्हा गुरू गोविंद सिंहजींचे आगमन झाले, त्यावेळी त्यांनी अशा अत्याचारांचा खूप विरोध केला, निर्दोषांचे रक्षण केले. लुटमार करणारे ना हिंदु असतात ना शिख असतात. जेव्हा ते पाहतात की शिख शिरजोर आहेत, तेव्हा ते लोकं दाढी धारण करतात व जेव्हा ते पाहतात की हिंदु शिरजोर आहेत, तेव्हा ते दाढी काढून बाजूला ठेवतात. आजकाल अशा बनावटी वस्तू बऱ्याच प्रमाणात मिळतात. मी जर चुकीचे बोलत असेल तर तुम्ही आपल्या प्रिंसिपॉल साहेबांना विचारू शकता. ते कधी–कधी नकली मिशा, नकली नाक लावून उभे राहतात.

संत सर्व जाती–धर्मांवर प्रेम करतात. गुरू गोविंद सिंहजींच्या शिकवणीवर आपण अंमल केला तर आपणांस कुणी शत्रूच दृष्टीस पडणार नाही.

लढाईच्या वेळी भाई कन्हैया नामक त्यांचा एक सेवक होता. जखमी सैनिकांना पाणी पाजण्याची त्याची सेवा होती. कन्हैया ध्यान–अभ्यास करीत अंतर्यात जात असे, त्यामुळे गुरू गोविंद सिंहजींच्या शिकवणीचे त्यास खरे आकलन झालेले होते. परंतु अनेकजणांना खऱ्या अर्थाने गुरू गोविंद सिंहजींची शिकवणूक समजलेली नव्हती. त्या लोकांनी गुरूसाहेबांकडे तक्रार केली की ज्या क्रूर व अत्याचारी शत्रूंना आम्ही मारतो, त्यांना कन्हैया पाणी पाजून पुन्हा ताजे–तवाने करतो.

भाई कन्हैयास बोलावून गुरू गोविंदसाहेब त्यास म्हणाले, ''हे लोकं तुझी तक्रार करीत आहेत की, ज्या शत्रूंना ते मारतात, त्यांना तू पाणी पाजतोस.'' भाई कन्हैया म्हणाला,''गुरुजी! मला तर कुणीच शत्रू दिसत नाही. सर्वांमध्ये तुम्हीच मला दिसता.'' गुरू गोविंद सिंहजी हसून म्हणाले, ''माझ्या शिकवणीचा खरा अर्थ याला समजला आहे.'' गुरू गोविंद सिंहजींनी भाई कन्हैयास मलम देऊन सांगितले की जो कुणी वेदनेने तळमळत असेल, ज्याला गंभीर जखम झाली असेल, त्यास हे मलमदेखील लावत जा. आजही भाई कन्हैयाच्या नावाने सेवापंथी लोकं एक पंथ चालवत आहेत.

संत आपणांस एकता आणि प्रेम शिकविण्यासाठी या जगात येतात. संत आपणांस सांगतात की आपल्या सर्वांचा परमात्मा एक असून आपण सर्वांवर प्रेम करावे. इतरांनी आपल्याशी जसे वागावे अशी आपण अपेक्षा करतो, तशीच वागणुक आपण आपल्या शेजाऱ्यांशी करावी; जगा आणि जगू द्या. मनुष्यास या धरतीवर जगण्याचा जितका अधिकार आहे, तेवढाच अधिकार पशु–पक्ष्यांनाही आहे. जे लोक संतांच्या शिकवणुकीपासून भरकटतात, तेच लोक हत्या करू लागतात, स्वत:ही अशांत असतात व इतरांनाही अशांत करतात. स्वत:चे जीवन दु:खी करतात आणि इतरांचे जीवनही दु:खमय करून टाकतात.

***

# अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान-अभ्यासाच्या कार्यक्रमाप्रारंभी संगतला दिलेला संदेश, संतबाणी आश्रम, राजस्थान



बंधूंनो, परमार्थ मार्गावर यशस्वी होण्यासाठी जी गुरूकिल्ली असते ती म्हणजे ध्यानअभ्यास व नामस्मरण. आपण जस्तीत-जास्त ध्यानअभ्यास-नामस्मरण करून यामार्गावर यशस्वी होऊ शकतो. आपणांस जाणीव आहे की सुख प्राप्त करण्याचे मुल्य दुःखं आहे.

सांसारिक व्यवसायात उन्नतीचा प्रश्न असो वा परमार्थातील प्रगतीचा प्रश्न असो, मेहनती मनुष्यच सदैव यशस्वी होतो. मोती प्राप्त करण्यासाठी खोल समुद्रात बुडी मारावीच लागते. खाणीत खोलवर खणूनच सोने काढले जाते. सोनाराचे तडाखे सहन केल्यानंतर सोने कोणाच्या हातात तर कोणाच्या कानात तर कोणाच्या माथ्यावर अलंकार बनून शोभिवंत दिसते.

संतमतात यशस्वी होण्यासाठी मजबूत पोलादी हृदयाची गरज असते. प्रत्येकास काही अटींचे पालन करणे गरजेचे असते, लोकलाज सोडावी लागते, मान-मोठेपणा त्यागावा लागतो आणि आपला हुद्दा विसरावा लागतो.

बाबा बिशनदासजी सांगत असत की गावातील मुली शहरात गेल्या. तेथे लोकं उपवस्त्रे, उपरणें, पगडी इत्यादी कपडे रंगवत होते. त्या मुलींना देखील वाटले की आपणही आपले उपवस्त्र रंगवून घ्यावे. त्या मुली रंगारीस म्हणाल्या,''भावा,आमची उपवस्त्रे देखील रंगवून दे.'' रंगारी म्हणाला, ''या बहिणींनो, मी आताच तुमची उपवस्त्रे रंगवून देतो. आपली उपवस्त्रे सुंदर बनवून देतो.'' त्या मुली म्हणाल्या,''आम्ही भर बाजारात आपल्या डोक्यावरील पदर काढून कसे उभे राहू शकतो?'' रंगारी म्हणाला,''तुमची उपवस्त्रे तुम्ही डोक्यावर घेतली असता मी ती कशी रंगवू शकेन?'' तुम्हीच विचार करून पहा! रंगाऱ्याकडे रंग आहे आणि तो उपवस्त्रे रंगविण्यात सामर्थ्यवान आहे. जर मुलींनी आपली उपवस्त्रे डोक्यावरून काढून त्यास दिली नाहीत तर रंगारी त्यांस कसे रंगवू शकेल?

त्याचप्रमाणे सतगुरूंकडे नामाचा रंग आहे. सतगुरू रंगविण्यासाठीदेखील तयार आहेत आणि सक्षमही आहेत, परंतु आपण विचार करतो की आपली लोकलाज शाबूत रहावी. आपण आपले मन सतगुरूंच्या स्वाधीन करीत नाही तर मग ते आपणांस नामाच्या रंगात कसे बरे रंगवू शकतील?

म्हणून बंधूंनो, आपल्या मनास शांत करा. शांत मनच ध्यान-अभ्यास करू शकते. ध्यान-अभ्यासास ओझे समजू नका, तो प्रेमाने व मनोभावे करा. ध्यान-अभ्यास करीत असता आपल्या मनास बाह्यजगातील कल्पनांमागे भटकू देऊ नका. बाहेरील कोणत्याही आवाजाकडे लक्ष देऊ नका. तिसऱ्या तिळावर एकाग्रचित्त व्हा. हां बंधूंनो आता ध्यानास बसा.

***

# धन्य अजायब

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचे कार्यक्रम



**संतबाणी आश्रम १६ पी. एस. राजस्थान येथे परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचे कार्यक्रम**

**७ ते ११ सप्टेंबर २०१७**

**२९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०१७**

**३ ते ५ नोव्हेंबर २०१७**

**१ ते ३ डिसेंबर २०१७**

**मुंबई येथे परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचा कार्यक्रम**

**३ ते ७ जानेवारी २०१८**